# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुं. पहिली खबर क्र. FIR No. 08 वर्ष Year 2026 दिनांक Date 06/04/26

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988 कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day दि. 09/03/2026 तारखेपासून Date from पासून दि. 05/04/2026 वेळ Time वेळ 14:15 वा दरम्यान तारीख पर्यंत Date to ........ वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 09/03/2026 वेळ Time 17:50

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 01/26 तारीख Date 06/04/2026 वेळ Time 01:30

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. मंत्रालय, मुंबई ते चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name विनय विलास को. ऑ. सोसा. च्या तळमजला येथील पंगत हॉटेल समोरील रोडवर ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village खारघर पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. रायगड राज्य State महाराष्ट्र

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name प्रमोद सुर्वे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name प्रकाश सुर्वे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 38 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ........
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी पोलीस निरीक्षक
   (g) धर्म Religion हिंदू जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address रवी रेसिडेन्सी गल्ली/सर्व्हे नं. Ward बिल्डींग B घर/नाव नं. House Name No. 601 फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road ओल्ड पनवेल जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village पनवेल पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. पनवेल शहर

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्री. विलास अनोबा लाड, वय 39 वर्षे, धंदा - नोकरी कक्ष अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
रा. ठि. रुम नं 201, बिल्डींग नं-04, सेलिब्रेशन सोसायटी, सेक्टर 17 खारघर जि रायगड



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

नमुद गुन्ह्यातील फिर्यादी श्री प्रमोद सुर्वे, वय - 38 वर्षे यांचा स्वतंत्र कागदावर जबाब नोंद करण्यात आला असुन तो त्यांचा प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात यावा.

समक्ष

(सागर अरगडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई.

(प्रमोद सुर्वे)

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

# फिर्याद

दिनांक ०६/०४/२०२६

मी, प्रमोद प्रकाश सुर्वे, वय ३८ वर्षे, धंदा– नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक – लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मो.क्र. ९७६७५३१९४७.

---

मी वरील प्रमाणे असून, दिनांक ११/०७/२०२३ रोजीपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे 'पोलीस निरीक्षक' या पदावर नियुक्तीस आहे.

मी, दिनांक ३०/०३/२०२६ रोजी ला.प्र.वि., मुंबई कार्यालयात कर्तव्यावर असताना मा. वरिष्ठांनी दिलेल्या लेखी आदेशाप्रमाणे ला.प्र.वि.,मुंबई येथे तक्रारदार श्री. रामकिसन शिंदे यांनी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या पडताळणी क्र. १६/२०२६ कारवाईकरीता नियुक्त असलेले पडताळणी/ सापळा अधिकारी पो.नि. संदीप गायकवाड हे दिनांक ३०/०३/२०२६ रोजीपासुन वैद्यकीय रजेवर गेले असल्याने, त्यांचे ऐवजी सदर पडताळणीच्या पुढील सापळापूर्व व सापळा कार्यवाहीकरीता माझी सापळा अधिकारी म्हणुन माझी नेमणुक केली.

ला.प्र.वि. मुंबई पडताळणी क्र. १६/२०२६ चे कागदपत्रांची मी स्वत: तपासणी केली असता, तक्रारदार श्री. रामकिसन भास्कर शिंदे, वय ३८ वर्षे यांनी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी समक्ष ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात येवुन स्व:हस्ताक्षरात मराठी भाषेमध्ये लोकसेवकाविरोधात लाच मागणी करीत असल्याबाबत पो.नि. संदीप गायकवाड यांचेकडे तक्रार अर्ज दिला होता. त्यांच्या तक्रारीची हकीकत अशी की,

"तक्रारदार श्री. रामकिसन भास्कर शिंदे, वय ३८ वर्षे, धंदा – टुर्स अ‍ॅण्ड ट्रॅव्हल्स, सध्याचा पत्ता – फ्लॅट नं. २०१, आबाजी हाऊस, विद्याविहार कॉलनी, लेन नं. १, अन्नपूर्णा हॉटेलच्या शेजारी, डि.पी. रोड, माळवाडी, हडपसर, जिल्हा पुणे व मुळ पत्ता – आहेर वडगाव, ता. जि. बीड असा आहे. तक्रारदार हे त्यांचे टुर्स अ‍ॅण्ड ट्रॅव्हल्सचे कामानिमित्त वरील नमूद पुणे येथे त्यांच्या कुटुंबियासोबत राहवयास आहेत. तसेच, तक्रारदार यांचे राहते गाव आहेर वडगाव, ता.जि. बीड येथे त्यांची आई आणि भाऊ रहावयास आहे.

तक्रारदार श्री. शिंदे यांच्या आहेर वडगाव, ता. जि. बीड गावच्या ग्रामपंचायती मार्फत मंत्रालयात २५/१५ व अल्पसंख्याक विभाग यांच्याशी संबंधित विविध विकास कामांचा प्रस्ताव दाखल करण्याकरीता, तसेच त्याअनुषंगाने मंत्रालय स्तरावर काम वेळेत पूर्ण करून घेण्यासाठी अधिकाऱ्यांना भेटणे आणि इतर कागदोपत्री पूर्तता करण्यासाठी तक्रारदार श्री. शिंदे यांना त्यांचे गावाचे वतीने सरपंच, ग्रामपचांयत आहेर वडगाव, ता.जि. बीड यांनी अधिकारपत्र दिले आहे.

सदर कामाच्या अनुषंगाने तक्रारदार श्री. शिंदे यांच्या ओळखीचे मंत्रालयातील नियोजन विभागातील कक्ष अधिकारी श्री. विलास लाड यांना जानेवारी २०२६ मध्ये मंत्रालयात जावुन प्रत्यक्ष भेटले होते. सदर भेटीनंतर त्यांनी तक्रारदार श्री. शिंदे यांना श्री. विलास लाड यांनी त्यांचा मोबाईल नंबर ९९६७७१८५४९ चे व्हॉटस्‌अ‍ॅपवर सर्व कागदपत्रे पाठविण्यास सांगितले होते. त्यावेळी तक्रारदार श्री. शिंदे यांनी त्यांना आहेर वडगाव या ग्रामपंचायतचे २५/१५ चे आणि अल्पसंख्याक विभागाचे विविध विकास कामांचा प्रस्ताव त्यांचे मोबाईल वर पाठविला. त्यानंतर श्री. विलास लाड यांनी त्यांचे मोबाईलवरून तक्रारदार श्री. शिंदे यांना आहेर वडगाव ग्रामपंचायतचे २५/१५ च्या योजनेचा रू. ५३,४०,०००/– व अल्पसंख्याक विकास कामाचे रू. ४३,२०,०००/– इतका शासकीय निधी मंजुर होईल असे मोबाईल फोनद्वारे सांगितले होते.

सुमारे एक ते दोन महीन्याचे दरम्यान वरील प्रमाणे निधीसंदर्भात श्री. विलास लाड यांनी तक्रारदार श्री. शिंदे यांच्या मोबाईलवर कॉल करून सांगुन आहेर वडगाव ग्रामपंचायतीच्या २५/१५ च्या योजनेचे रू. ५३,४०,०००/– व अल्पसंख्याक विकास कामाचे रू. ४३,२०,०००/– इतका शासकीय निधी मंजुर होईल.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

परंतु त्याकरीता तक्रारदार श्री. शिंदे यांना २५/१५ या योजनेच्या रक्कमचे ७ टक्के प्रमाणे रू. ३,७३,८००/– अल्पसंख्याक विकास कामाचे ६ टक्के प्रमाणे रू. २,५९,२००/– इतकी रक्कम लाच स्वरूपात द्यावी लागेल असे सांगितले. त्यावेळी श्री. विलास लाड यांनी तक्रारदार श्री. शिंदे यांना सदर ग्रामविकास निधीची दोन्ही कामे मंत्रालयातील ग्रामविकास विभाग तसेच अल्पसंख्यांक विभाग येथुन करणार असलेबाबत सांगीतले. तसेच सदरची ग्रामविकास निधीची कामे ते त्यांचे ओळखीचे अल्पसंख्यांक विभागाचे श्री. प्रशांत अंधारे यांचेकडुन करून घेणार असल्याचे सांगीतले आहे. अशा प्रकारे दोन्ही विकासकामांच्या शासकीय निधीच्या मंजुरीकरीता एकुण लाचेची रक्कम रूपये ६,३३,०००/– इतकी द्यावी लागेल असे सांगुन सदर लाचेची रक्कम त्यांना त्यांचे ओळखीचे श्री. प्रशांत अंधारे यांना द्यावयाची असल्याचे सांगीतले.

तरी, त्यानंतर दिनांक ०९/०३/२०२६ रोजी तक्रारदार श्री. शिंदे यांनी श्री. विलास लाड यांना फोन केला असता, वरीलप्रमाणे मोबाईलवरील २५/१५ ग्रामपंचायतीच्या योजने संदर्भात अर्ज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी तक्रारदार श्री. शिंदे यांना मंत्रालय येथे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. शिंदे यांनी नमुद ग्रामपंचायतीचे शासकीय निधी मिळणेबाबतचे अर्ज मंत्रालय येथे दिले आहेत. तरी तक्रारदार श्री. शिंदे यांना नमुद शासकीय कर्मचारी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार श्री. शिंदे हे तक्रार देण्याकरीता दिनांक ०९/०३/२०२६ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो येथे आले. तरी वरील नमुद एकुण रू ६,३३,०००/– लाचेच्या रक्कमेपैकी पहिला हप्ता म्हणून रू. १,००,०००/– दिनांक ०९/०३/२०२६ रोजी शासकीय कामाची वेळ संपल्यानंतर श्री. विलास लाड यांना देण्यास सांगितले आहे व येण्यापूर्वी श्री. विलास लाड यांना फोन करून येण्यास सांगितले आहे, असे तक्रारदार यांनी सांगितले. तरी तक्रारदार श्री. शिंदे यांच्या आहेर वडगाव गावचे मुलभुत विकासाकरीता २५/१५ योजना व अल्पसंख्यांक योजनेचा शासकीय निधी मंजुर होवुन मिळणेकरीता तक्रारदार श्री. शिंदे यांच्याकडे विकास लाड यांनी ६,३३,०००/– इतकी लाचेची रक्कम मागितल्याने तक्रारदार श्री. शिंदे यांची श्री. विलास लाड यांचेविरूध्द तक्रार आहे.

तक्रारदार श्री. शिंदे व शासकीय कर्मचारी श्री. विलास लाड यांच्यामध्ये आर्थिक व्यवहारावरून कोणताही वाद किंवा पुर्ववैमनस्य नाही. तक्रारदार श्री. रामकिसन शिंदे यांना लोकसेवक श्री. विलास लाड यांना लाच देण्याची ईच्छा नाही. तक्रारदार यांनी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष हजर होवून मंत्रालय येथील नियोजन विभागातील कक्ष अधिकारी श्री. विलास लाड हे लाच मागणी करत असल्याबाबत स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज दिला होता.''

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पो.नि. संदीप गायकवाड यांनी पडताळणी क्र. १६/२०२६ प्रमाणे नोंद घेवुन शासकीय पंच नामे १) श्री. प्रशांत पांडुरंग सानप, वय ४९ वर्षे, धंदा– नोकरी (राज्यकर निरीक्षक), कार्यालयाचा पत्ता– वस्तु व सेवा कर विभाग, नवीन इमारत, तळमजला, आस्थापना, नोडल ०९ व लेखापरीक्षण ०३ विभाग, माझगाव, मुंबई १०,रा.ठि. बी–३/३७९ जीवदानी दर्शन, अरूणोदय नगर, मुलूंड (पुर्व), मुंबई ८१. मो.नं. ९६६४०४९५३३, आधार कार्ड नं. ९१८६ ९९०६८०९० २) सौ. रिमा देवेंद्र गमरे, वय ४९ वर्षे, धंदा– नोकरी (राज्यकर निरीक्षक), कार्यालयाचा पत्ता– वस्तु व सेवा कर विभाग, नवीन इमारत, तळमजला, आस्थापना, नोडल ०९ व लेखापरीक्षण ०३ विभाग, माझगाव, मुंबई १०, रा.ठि. – रूम नं. ७ ए/९०३, इंद्रधनुष्य, म्हाडा, कन्नमवार नगर – २, विक्रोळी, मुंबई ८३, मो.नं. ९९६९०१८९३६, आधार कार्ड नं. ७१८३ ३५३० १२८० यांच्या उपस्थितीत दिनांक ०९/०३/२०२६, दिनांक १३/०३/२०२६, दिनांक १६/०३/२०२६ व दिनांक १७/०३/२०२६ रोजी पडताळणी कारवाई आयोजित करण्यात आलेली होती.

त्यातील दिनांक १६/०३/२०२६ रोजी झालेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक श्री. विलास लाड व तक्रारदार श्री. रामकिसन शिंदे यांच्या प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले. सदर संभाषणामध्ये लोकसेवक श्री. लाड यांनी तक्रारदार श्री.

Scanned with OKEN Scanner

शिंदे यांना "**किती आकडा सांग मी तूला सांगतो म्हणजे मी मला करायलाच वेळ मिळाला नाय,** असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी "**तुम्ही मला पंचवीस पंधराच दिल होत त्रेपन्न पॉईन्ट नव्वद**" असे विचारले असता, तेव्हा लोकसेवक यांनी होकार देऊन "**हो आणि सदोतीस पॉईन्ट विस आहे ना?**" असे बोलले. तेव्हा तक्रारादार यांनी हा **हा अल्पसख्यांक.** तक्रारदार यांचे दुसरे प्रलंबित कामाबाबत चर्चा केल्यानंतर लोकसेवक यांनी "**हा, तर दोन्ही किती होतात माहिती आहे का, त्रेपन्न आणि सात, साठ आणि तीस नव्वद, नव्वद आणि एक एक्यान्नव समज पकड,**" दोन्ही प्रलंबित काम करुन देण्याकरीता एकूण लाचेची रक्कम बाबत चर्चा केली. त्यानंतर लोकसेवक लाड यांनी तक्रारादार यांना '**आपल्याला सहा टक्क्याने दयायचे आहेत आणि हयांच एक स्क्रिनशॉट काढतो, हे माझेकडे ठेवतो, हे दाखवित नाही म्हणजे तुला कन्फ्युज होणार नाय.**' असे म्हटले. त्यानंतर लोकसेवक लाड यांनी तक्रारदार यांना '**आता हयाच्यात सात टक्क्याने करुन, त्याला सहा सदोतीस टोटल.**' असे म्हटले. त्या अनुषंगाने वरील तक्रारदार व लोकसेवक यांचे प्रत्यक्ष भेटीदरम्यान झालेल्या ध्वनिमुद्रीत संभाषणावरून लोकसेवक श्री. लाड हे तक्रारदार श्री. शिंदे यांचेकडे लाचेची मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने दिनांक १६/०३/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई पो.नि. अरगडे व पो.नि. गायकवाड यांनी तहकूब करून दिनांक १७/०३/२०२६ रोजी तक्रारदार श्री. रामकिसन शिंदे व लोकसेवक श्री. विलास लाड यांचे मोबाईलवरील झालेल्या संभाषणामध्ये तक्रारदार श्री. शिंदे यांनी लाचेची रक्कमेची व्यवस्था करण्याकरीता ते बीड येथ जाणार असल्याबाबत लोकसेवक यांचेसोबत चर्चा केली. त्यावर लोकसेवक श्री लाड यांनी तक्रारदार श्री. रामकिसन शिंदे यांना बीड येथे जाण्याकरीता होकार दर्शविला होता. त्यानुसार पो.नि. अरगडे व पो.नि. गायकवाड यांनी दिनांक १७/०३/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई तहकूब केली होती.

दि. ३०/०३/२०२६ रोजी पडताळणी क्र. १६/२०२६ च्या अनुषंगाने मी पुन्हा तक्रारदार श्री. रामकिसन शिंदे यांच्यांकडे चौकशी केली. तक्रारदार श्री. शिंदे यांनी लाचेची रक्कम उपलब्ध करण्याकरीता लोकसेवकाकडे वेळ मागून घेतला होता, परंतु तक्रारदार यांच्याकडे रू. ६,३७,०००/- इतकी लाचेची रक्कम उपलब्ध होत नव्हती व यातील लोकसेवक श्री. लाड हे तक्रारदार यांच्याकडे लाच मागणीकरीता वारंवार फोन व व्हॉटअॅप मेसेजव्दारे सपाटा लावत असल्याचे तक्रारदार यांनी मला सांगितले.

त्यानंतर तक्रारदार श्री. शिंदे यांनी दिनांक ०१/०४/२०२६ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात येवून सांगितले की, लोकसेवक श्री. विलास लाड यांनी त्यांना दिनांक ३१/०३/२०२६ रोजी फोन व व्हॉटस्अॅप मेसेजव्दारे दिनांक ०१/०४/२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वा.चे पर्यंत लाचेची रक्कम खारघर येथे घेवून येण्यास सांगितले आहे. त्याप्रमाणे पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरले. परंतु, ला.प्र.वि., मुंबई व खारघर, नवी मुंबई मधील अंतर जास्त असल्याने, लोकसेवकाचा कॉल येण्यापुर्वी तक्रारदार, पंच व पथकासह खारघर, नवी मुंबई येथे जाण्याचा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे माझ्या व पो.नि. अरगडे यांच्या सूचनेप्रमाणे वक्तव्य हे नमुद ठिकाणी पोहचल्यानंतर घेण्यात येणार असल्याचे तसेच त्यानंतर सापळापुर्व/सापळा कारवाई करणार असल्याचे पंच व पथकास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही, पंच व सापळा पथक हे तक्रारदार श्री. शिंदे यांचे खाजगी वाहनात व इतर पथक दोन शासकीय वाहनातून खारघर, नवी मुंबईच्या दिशेने रवाना झालो. त्याप्रमाणे तक्रारदार व शासकीय वाहन चालक पो.शि. साबळे यांनी वाहन कोणासही संशय येणार नाही अशारितीने खारघर रेल्वे स्टेशन बाहेरील सायन पनवेल हायवे रस्त्यालगत थांबविले. तसेच दुसरे शासकीय वाहन चालक पो.ह. पुरळकर यांना संपर्क करून वाहन थोडया अंतरावर कोणासही संशय येणार नाही अशारितीने थांबण्यास सांगितले.

त्यानंतर पो.ह. यादव यांना त्यांच्याकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम माझे स्वतःचे, तक्रारदाराचे व दोन्ही पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार श्री रामकिसन शिंदे यांना त्यांचा मोबाईल क्रमांक ९६२३५१६२९२ वरून लोकसेवक श्री. विलास लाड यांचे मोबाईल क्रमांक ९९६७७१८५४९ यावर कॉल केला असता, लोकसेवक श्री. विलास लाड हे वैयक्तिक कारणास्तव मुंबई बाहेर

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

गेल्याचे तसेच ते दिनांक ०२/०४/२०२६ रोजी तक्रारदार श्री. रामकिसन शिंदे यांना कॉल करून भेटण्याबाबत कळवणार आहेत असे समजल्याने दिनांक ०१/०४/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई तहकूब करण्यात आली. परंतू लोकसेवक श्री. विलास लाड यांनी तक्रारदार श्री. शिंदे यांना दि. ०२/०४/२०२६ रोजी कोणताही संपर्क केला नसल्याने दिनांक ०२/०४/२०२६ रोजी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

दिनांक ०४/०४/२०२६ रोजी तक्रारदार श्री. शिंदे यांनी पो.नि. अरगडे यांना मोबाईलवर कॉल करून सांगितले की, लोकसेवक श्री. लाड यांनी त्यांना फोनव्दारे संपर्क करून दिनांक ०५/०४/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजेपर्यंत लाचेची रक्कम खारघर येथे घेवून येण्यास सांगितले आहे. त्याप्रमाणे आम्ही पुढील सापळा कारवाई ही दिनांक ०५/०४/२०२६ रोजी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दिनांक ०५/०४/२०२६ रोजी मी, पो.नि. अरगडे, तक्रारदार श्री. शिंदे, दोन्ही पंच व पोलीस पथक असे ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात आल्यानंतर मी व पो.नि. अरगडे यांनी दोन्ही पंच, तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. तद्नंतर मी, तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये २०,०००/- इतकीच रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. त्यामुळे मी व पो.नि. अरगडे यांनी उर्वरित ६,१७,०००/- रू. इतक्या रक्कमेच्या ५०० रूपये दराच्या १२३४ खेळण्यातील डमी नोटा उपलब्ध केल्या. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेप्रमाणे पथकातील अंमलदार पो.ह. गावडे यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. २०,०००/- (त्यामध्ये रू.५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ४० नोटा) यांच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. सदर झेरॉक्स प्रतीवर पंचांच्या व माझी सही केली.

त्यानंतर ला.प्र.वि., मुंबई व खारघर, नवी मुंबई मधील अंतर जास्त असल्याने, लोकसेवकाचा कॉल येण्यापुर्वी तक्रारदार, पंच व पथकासह खारघर, नवी मुंबई येथे जाण्याचा निर्णय घेतला. तसेच पो.नि. अरगडे व मी दिलेल्या सूचनेप्रमाणे वक्तव्य हे नमुद ठिकाणी पोहचल्यानंतर घेण्यात येणार असल्याचे तसेच त्यानंतर पुढील कारवाई करणार असल्याचे पंच व पथकास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही, पंच व पोलीस पथक हे तक्रारदार श्री. शिंदे यांचे मालकीचे टुरिस्ट वाहन क्र. एमएच.१२.व्ही.एफ.२४१५ व दोन शासकीय वाहन एमएच.०१.एएन. १७०४ व एमएच.०१.एएन.२१२५ यामध्ये तक्रारदार, पंच व पोलीस पथकासह बसलो व तिनही वाहने ही खारघर, नवी मुंबईच्या दिशेने घेण्यास सांगितली. त्याप्रमाणे तक्रारदार व शासकीय वाहन चालक पो.शि. साबळे यांनी वाहन कोणासही संशय येणार नाही अशारितीने वाहन बालाजी आंगन को.ऑ.हौ.सो. मर्या., सेक्टर ३, बेलपाडा, खारघर येथील रस्त्यालगत थांबविले. तसेच दुसरे शासकीय वाहन चालक पो.ह. पुरळकर यांना संपर्क करून वाहन थोडया अंतरावर कोणासही संशय येणार नाही अशारितीने थांबण्यास सांगितले. त्यानंतर मी पो.ह. यादव यांना त्यांच्याकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून, त्यामध्ये प्रथम माझे स्वतःचे, तक्रारदाराचे व दोन्ही पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर मी तक्रारदार श्री रामकिसन शिंदे यांना त्यांचा मोबाईल क्रमांक ९६२३५१६२९२ वरून लोकसेवक श्री. विलास लाड यांचे मोबाईल क्रमांक ९९६७७१८५४९ यावर कॉल करण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लोकसेवकास कॉल केला असता, लोकसेवक श्री. लाड यांनी कॉल स्विकारला नाही. म्हणून तक्रारदार यांनी लोकसेवकास व्हॉट्सअॅप मेसेजव्दारे 'साहेब मी आलो आहे जवळ. पंधरा मिनीटामध्ये पोहोचत आहे. तुमचा फोन लागत नाही फोन करा' असा मेसेज पाठविला असता, लोकसेवक श्री. विलास लाड यांनी तक्रारदार श्री. शिंदे यास 'सोसायटी गेटवर आल्यास फोन कर' असा मेसेज पाठविला.

त्याप्रमाणे मी, पंच व पोलीस पथकास माहिती दिली. तसेच पंच व तक्रारदार यांना अॅथ्रांसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. त्यानंतर शासकीय वाहन चालक पो.शि. साबळे याचेमार्फतीने लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रू.२०,०००/- (रू.५०० दराच्या भारतीय चलनातील ४० नोटा) व रू.६,१७,०००/- (रू.५०० दराच्या खेळण्यातील १२३४ डमी नोटा) असे एकुण ६,३७,०००/- लाचेची रक्कम एकत्रित करून नमुद रक्कमेस अॅथ्रांसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम एकत्रित करून वर्तमानपत्रामध्ये गुंडाळून सफेद रंगाच्या

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये ठेवून त्यास देखील बाहेरून अँथ्रासिन पावडर लावून ती पिशवी तक्रारदार याच्या खाजगी वाहनाच्या चालकाच्या सीटच्या खाली ठेवली. तसेच पो.शि. साबळे हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेसहीत त्यांच्या खाजगी वाहनाने लोकसेवक श्री. लाड यांनी सांगितल्याप्रमाणे सोसायटीजवळ जाण्यास सांगितले. तसेच मी, पो.नि. अरगडे, पंच व उर्वरित पथक असे वेगवेगळया ऑटो रिक्षाने तक्रारदार यांच्या वाहनाचे पाठोपाठ कोणासही संशय येणार नाही अशा रितीने रवाना झालो. तक्रारदार हे त्यांच्या खाजगी वाहनातून लोकसेवक श्री. लाड यांचे सेलिब्रेशन केएच–४ सोसायटी, सेक्टर १७, खारघर, नवी मुंबई येथील लगत असलेल्या विनय विवंता को.ऑप.हौ. सोसायटीच्या तळमजल्यावरील पंगत हॉटेलच्या समोर रोडवर गाडीतच थांबून राहीले. तसेच उर्वरित पथक व पंच नमूद ठिकाणी आजूबाजूस सापळा रचून तक्रारदार दिसतील अशा रितीने थांबलेले होते. थोडयावेळाने लोकसेवक श्री. लाड हे त्यांच्या दुचाकीवरून बाबासाहेब फुटवेअर नावाच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानाजवळ आले असता, तक्रारदार हे लोकसेवक यांच्या दुचाकी वाहनाजवळ गेले. त्यावेळेस त्या दोघांमध्ये बोलणे सुरू झाले व लगेचच तक्रारदार हे लोकसेवक यांना त्यांच्या चारचाकी वाहनात घेवून गेले. काही वेळानंतर तक्रारदार व लोकसेवक हे चारचाकी वाहनातून खाली उतरले असता, तक्रारदार यांनी पथकास दिसेल अशारितीने मान हलवून लोकसेवकाने लाच स्विकारलेबाबत पूर्वनियोजित इशारा दिला. त्यानंतर लोकसेवक श्री. लाड हे वाहनातून उतरून विनय विवंता को.ऑप.हौ. सोसायटीच्या दिशेने जात असतानाच पोलीस पथकातील पो.नि. अरगडे व सापळा पथकाने लागलीच पंचांसह लोकसेवक श्री. विलास लाड यांना १४:१५ वा. ताब्यात घेतले.

त्यावेळी मी सदर लोकसेवकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव विलास ज्ञानोबा लाड, वय ३९ वर्षे, धंदा नोकरी पद – कक्ष अधिकारी (नेमणुक : नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई), राठी : रूम नं. २०१, बि.नं. ९, सेलिब्रेशन सोसायटी, सेक्टर १७, पंगत हॉटेलजवळ, खारघर, नवी मुंबई ४१०२१० असे सांगितले. त्यांच्याकडे लाचेच्या रक्कमेबाबत अधिक चौकशी केली असता, आरोपी लोकसेवक श्री. विलास लाड यांनी सदर लाचेची रक्कम त्यांच्याजवळ नसल्याचे सांगून उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे मी व पो.नि. अरगडे यांनी लाचेच्या रक्कमेबाबत तक्रारदार यांचेजवळ जावून त्यांना विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगितले की, लोकसेवक श्री. लाड यांनी तक्रारदार यांच्या वाहनात बसल्यानंतर तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम असलेली सफेद रंगाची प्लॅस्टीकची पिशवी स्विकारली. नमूद पिशवीतील वर्तमानपत्रात गुंडाळलेली लाचेची रक्कम काढून नोटांचे बंडल मोजण्यास सुरूवात केली असता, लोकसेवक यांना संशय आल्याने ते लाचेची रक्कम गाडीमध्येच ठेवून गाडीतून उतरले. त्यानंतर मी व पो.नि. अरगडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे लोकसेवकास शासकीय वाहनात बसवून शासकीय वाहनातच काळा कपडा भोवताली पकडून कृत्रीम अंधार तयार करून पंचासमक्ष मी अल्ट्रव्हायलेट दिव्याच्या सहाय्याने लोकसेवक श्री. लाड यांच्या हाताची व परिधान केलेल्या कपडयाची तपासणी केली असता, लोकसेवक श्री. लाड यांच्या दोन्ही हाताच्या बोटांना व तळहातास तसेच त्यांनी परिधान केलेल्या कपडयांवर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर नमुद लाचेची रक्कम हस्तगत करणेकामी मी, पो.नि. अरगडे व पंच असे तक्रारदार श्री. शिंदे यांच्या खाजगी वाहनाजवळ गेलो असता, नमुद लाचेची रक्कम ही तक्रारदार यांच्या वाहनाचे चालकाच्या सीटवर वर्तमानपत्रात ठेवलेली असल्याचे दिसून आले. नमुद लाचेची रक्कम ही मी पंच क्र. २/श्री. गमरे यांना तपासून ताब्यात घेण्यास सांगितले. त्यानंतर माझ्या सूचनेनुसार तक्रारदार यांना दुसऱ्या शासकीय वाहनात बसवून काळा कपडा भोवताली पकडून कृत्रीम अंधार तयार करून पो.ह. गावडे यांनी अल्ट्रव्हायलेट दिव्याच्या सहाय्याने तक्रारदार यांच्या हाताची व परिधान केलेल्या कपडयाची तपासणी केली असता, तक्रारदार यांच्या दोन्ही हाताच्या बोटांना व तळहातास फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

तरी आरोपी लोकसेवक श्री. विलास लाड यांनी तक्रारदार श्री. शिंदे यांच्या आहेर वडगाव ग्रामपंचायत, जि. बीड यांच्यामार्फत मंत्रालयातील २५/१५ व अल्पसंख्यांक विभाग यांचेसंबंधीत विविध विकास कामाचा निधी मंजूर करण्याकरीता रूपये ६,३७,०००/– लाचेची रक्कम मागणी करून दिनांक ०५/०४/२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. विलास लाड यांनी तक्रारदार यांचेकडून स्विकारली, म्हणुन माझी आरोपी लोकसेवक श्री. विलास लाड यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असुन, तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(सागर आरगडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

(प्रमोद सुर्वे)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ नाकाळ ........
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........
Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता.वेळी व ठिकाणी तक्रारदार श्री रामकिसन शिंदे यांचे आहेर वडगांव, ता. जि. बीड गावचे मुलभुत विकास कामाकरिता 25/15 व अल्पसंख्यांक योजनेअंतर्गत शासकीय निधी मंजुर करुन देणेकरिता यातील लोकसेवक श्री विलास ज्ञानोबा लाड, कक्ष अधिकारी, वर्ग-1, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. 18/04/26 रोजी तक्रारदार यांचेकडे 6,37,000/- रु लाचेची मागणी करुन दि. 05/04/26 रोजी सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी विलास लाड यांनी तक्रारदार यांच्याकडुन खारघर, नवीमुंबई येथे पंचासमक्ष 6,37,000/- रु. लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन त्यांच्यावर कलम 7 भ्र.प्र. अधि. 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : सपोअ संदीप वडगुजर, ला.प्र.वि. मुंबई

**2.** तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........

(3) Transferred to P. S. ........
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ सागर धरगुडे
पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. ........ ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

| प्रत<br>Copy to | 2 फिर्यादी,<br>2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक),<br>3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार,<br>4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत.<br>5. Office Copy. |
|---|---|---|---|---|

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner